**विषय: डिजी लॉकर (Digi Locker)मधील अनुज्ञप्ती व नोंदणी प्रमाणपत्र ग्राहय धरण्याबाबत.**

**परिवहन आयुक्त यांचे कार्यालय,**
प्रशासकीय इमारत, ३ रा व ४ था मजला,
डॉ.आंबेडकर उद्यानाजवळ,सरकारी वसाहत
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.

**क्रमांक-२८**/पआ/का.११/संगणक/डिजीटल लॉकर/२०१८/जा.क्र.।22७9 दिनांक- 18 AUG 2018

## परिपत्रक

**संदर्भ-१.** MORTH चे दिनांक ०७.०९.२०१६ रोजीचे प्रसिध्दी पत्रक .
२. Ministry of Electronics and Information Technology (MeitY) यांचे दिनांक ०८.०२.२०१७ रोजीचे अधिसुचना.
३. रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालय यांचे दिनांक ०८.०८.२०१८ रोजीचे पत्र.

केंद्र शासनातर्फे डिजी लॉकर (Digi Locker) प्रणाली विकसीत करण्यात आली असून या प्रणाली मध्ये केंद्र / राज्य शासनातर्फे नागरिकांना जारी करण्यात येणाऱ्या कागदपत्रांची डिजीटल कॉपी डिजी लॉकर मध्ये उपलब्ध आहे. अर्जदार त्यांचा आधार क्रमांक डिजी लॉकर बरोबर सलग्न (link) करुन डिजी लॉकरमध्ये आपले कुठलेही कागदपत्र जतन करुन ठेवू शकतो.

केंद्र शासनाच्या रस्ते, वाहतुक आणि महामार्ग मंत्रालय (MoRTH) यांनी वाहन चालक अनुज्ञप्ती आणि वाहन नोंदणी प्रमाणपत्राची डिजीटल कॉपी डिजी लॉकर मोबाईल ॲपव्दारे उपलब्ध करुन देण्याची सुविधा दिली आहे. या संदर्भाने दिनांक ०७.०९.२०१६ रोजी प्रसिध्दी पत्रक जारी केले आहे. तसेच रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालय यांचे दिनांक ०८.०८.२०१८ रोजीच्या पत्राद्वारे (प्रत संलग्न) इलेक्ट्रॉनिक फॉर्म मध्ये कागदपत्र उपलब्ध असल्यास त्याचे पुस्तकीस्वरूपात पुन्हा मागणी न करण्याबाबत सुचना दिल्या आहेत व एखाद्या प्रकरणात अनुज्ञप्ती नोंदणी प्रमाणपत्र जप्त करावयाची असल्यास अंमलबजावणी पथकाने त्याची नोंद ई-चलान माध्यमातून वाहन / सारथी प्रणाली मध्ये घ्यावी व अशा प्रकरणात फिझीकल (physical) स्वरूपातील कागदपत्रे जप्त करण्याची आवश्यकता नाही. असे सुचना दिले आहे. तसेच Ministry of Electronics and Information Technology (MeitY)यांनी दिनांक ०८.०२.२०१७ रोजी जारी केलेल्या अधिसुचनेतील नियम ९A मध्ये पुढिल प्रमाणे नमुद केले आहे.

**"Issuing certificates or documents in Digital Locket System and accepting certificates or documents from Digital Locker Account at par with physical Documents "**

The Information Technology Act, २००० मधील प्रकरण ३ मधील कलम ४ व ५ मध्ये **Legal recognition of electronic records and Legal recognition of digital signatures** बाबत तरतूद असून एखादे कागदपत्र डिजीटली स्वाक्षरी केली असता ते फिजीकल कॉपी ठेवण्या समान आहे असे नमूद आहे.**(प्रत जोडली आहे).**

Scanned by CamScanner

डिजी लॉकर (Digi Locker) ॲपचा वापर करून नागरिक त्यांना जारी करण्यात आलेले वाहन चालक अनुज्ञप्ती / वाहन नोंदणी प्रमाणपत्राची डिजीटल कॉपी स्वत:च्या मोबाईल मध्ये जतन करु शकतात. तसेच परिवहन विभागातील/वाहतुक विभागतील अंमलबजावणी अधिकाऱ्यांनी वाहन चालकास अनुज्ञप्ती व नोंदणी प्रमाणपत्राची मागणी केल्यास डिजी लॉकर मधील कागदपत्रे दाखवू शकतात.

सर्व कार्यालयांना सुचित करण्यात येते की, विभागाच्या संकेतस्थळावर डिजी लॉकर व्दारे अनुज्ञप्ती, नोंदणी प्रमाणपत्र जतन करण्याबाबत माहिती प्रदर्शित करण्यात आली आहे. तसेच नागरिकांकडे जर डिजी लॉकर मधील डिजीटली साक्षांकीत केलेले वाहन चालक अनुज्ञप्ती आणि वाहन नोंदणी प्रमाणपत्राची प्रत उपलब्ध असेल व रस्त्यावर वाहतूक करतांना वाहन चालकास अंमलबजावणी अधिका-यांनी किंवा वाहतूक पोलीस अधिकाऱ्यांनी कागदपत्रासाठी थांबविले असता त्यांनी जर मुळ वाहन चालक अनुज्ञप्ती / वाहन नोंदणी प्रमाणपत्रा ऐवजी डिजीटल स्वरुपातील वाहन चालक अनुज्ञप्ती / वाहन नोंदणी प्रमाणपत्र दाखविल्यास ते ग्राह्य धरण्यात यावे व त्यांचे विरुध्द केंद्रीय मोटार वाहन अधिनियम १९८८ च्या कलम १३०, १७७ अन्वये कारवाई करण्यात येवू नये. तसेच या बाबत पोलीस आयुक्त / पोलीस अधिक्षक स्तरावर बैठक घेवून डिजीलॉकर बाबत माहिती देण्यात यावी. या योजने संदर्भात स्थानिक पातळीवर व्यापक प्रसिध्दी दयावी.

(शेखर चन्ने)
परिवहन आयुक्त,
महाराष्ट्र राज्य मुंबई.

**सहपत्र-** वरीलप्रमाणे

**प्रत:-**

१. मा. अपर मुख्य सचिव (गृह), मंत्रालय यांना माहितीकरिता.
२. मा. प्रधान सचिव (परिवहन व बंदरे), मंत्रालय यांना माहितीकरिता.
३. मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांना माहितीकरिता.
४. मा. अपर पोलीस महासंचालक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य यांना माहितीकरिता.
५. सर्व पोलीस आयुक्त यांना माहितीकरिता.
६. सह पोलीस आयुक्त (वाहतूक), मुंबई यांना माहितीकरिता.
७. सर्व पोलीस अधिक्षक यांना माहितीकरिता.
८. परिवहन आयुक्त कार्यालयातील सर्व नियंत्रण अधिकारी.
९. सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी/ उप प्रादशिक परिवहन अधिकारी यांना कार्यवाहीस्तव.
१०. आदेश नोंद वही.

Scanned by CamScanner